# बदल्यांसाठी पुन्हा 'कॅश फॉर ट्रान्सफर'

## पालिका अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे यांची माहिती देण्यास टाळाटाळ

### आमदार मिहीर कोटेचा यांची मुख्य सचिवांकडे तक्रार



**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेतील अभियंत्यांच्या बदल्यांमध्ये आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय भाजप आमदार मिहीर कोटेचा यांनी व्यक्त केला आहे. विधानसभा सदस्याने मागितलेल्या माहितीला अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) अविनाश ढाकणे यांच्याकडून उत्तर देण्यास विलंब होत असल्याचेही कोटेचा यांनी म्हटले आहे. त्यामुळे अविनाश ढाकणे यांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करणारे पत्र राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना कोटेचा यांनी दिले आहे.

मुंबई महानगरपालिकेतील अभियंत्यांच्या बदल्यांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. २०२ मध्ये तत्कालीन महापालिका आयुक्तांनी १६५ अभियंत्यांच्या बदल्यांचे आदेश काढले होते. या बदल्यांमध्ये 'कॅश फॉर ट्रान्सफर'चा प्रकार होत असल्याची लेखी तक्रार आमदार अमित साटम यांनी केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री यांच्या आदेशाने संबंधित बदल्या रद्द करण्यात आल्याचा दावा कोटेचा यांनी केला आहे.

आमदार मिहिर कोटेचा यांच्या म्हणण्यानुसार, १५ मे २०२६ रोजी त्यांनी महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना पत्र पाठवून जुन्या १६५ बदल्यांच्या प्रस्तावातील सुमारे ५० टक्के अभियंत्यांचा समावेश असलेला नवीन बदली प्रस्ताव तयार करण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले होते. हा प्रस्ताव अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) यांच्या मार्गदर्शनाखाली होत होते. माझ्या पत्राची दखल घेत आयुक्तांनी प्रस्तावित बदली यादी रद्द केली, असेही कोटेचा यांनी मुख्य सचिवांना कळविले आहे.

### 'रेट कार्ड'ची माहिती असल्याचा दावा

दोन-तीन महिन्यांपूर्वी झालेल्या अभियंत्यांच्या बदल्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याची माहिती मिळाल्याचा दावा कोटेचा यांनी केला आहे. या अनियमिततेशी संबंधित 'रेट कार्ड'सह माहिती आपल्याकडे असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. या माहितीची खातरजमा करण्यासाठी काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करून ५ ऑगस्ट २०२६ रोजी अतिरिक्त महापालिका आयुक्त अविनाश ढाकणे यांच्याकडे माहिती मागितली होती. पत्राला २६ दिवस उलटूनही उत्तर मिळाले नसल्याचे आमदार कोटेचा यांनी मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

### माहिती मिळाल्यास अनियमितता बाहेर येईल

प्रमुख प्रश्नांची माहिती आणि उत्तरे मिळाल्यास बदल्यांमध्ये पुन्हा 'कॅश फॉर ट्रान्सफर' झाले आहे का, याबाबत उपलब्ध माहितीच्या आधारे निष्कर्ष काढता येईल, असा दावा कोटेचा यांनी केला आहे. माहिती देण्यास होत असलेल्या विलंबामुळे अविनाश ढाकणे यांच्या भूमिकेबाबत आपला संशय अधिक तीव्र होत असल्याचेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

# मुंबईकरांचा पैसा मुंबईकरांसाठीच

## महायुतीच्या २०० दिवसांच्या कारभाराचा लेखाजोखा



**मुंबई :** मुंबई महापालिकेचा कारभार पारदर्शक, भ्रष्टाचार मुक्त तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर, मुंबईकरांच्या पैशांची बचत, मुंबईकरांचा पैसा मुंबईकरांसाठी यावर मंगळवारी झालेल्या भाजपच्या कार्यकारणी बैठकीत भर देण्यात आला. मुंबई महानगरपालिकेतील महायुतीच्या २०० दिवसांच्या कारभाराचा लेखाजोखा मांडण्यात आला.

भाजपने गेल्या २५ वर्षांतील शिवसेनेच्या कारभारावर टीका करत महापालिकेतील 'अंडरस्टँडिंग सिस्टीम' मोडीत काढून पारदर्शक कारभाराची सुरुवात केल्याचा दावा केला आहे. शालेय साहित्याची खरेदी थेट जेम पोर्टलवरून केल्यामुळे सुमारे ४५ कोटी रुपयांची बचत झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

रुग्णालयांमध्ये ऑनलाइन बेड उपलब्धता प्रणाली सुरू करून रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. जन्म-मृत्यू नोंदणीतील कथित गैरप्रकारांबाबत एसआयटी चौकशी सुरू असून सुमारे ८७ हजार संशयास्पद नोंदी आढळल्याचेही प्रस्तावात नमूद आहे. पूरमुक्त मुंबईसाठी १३ हजार कोटी रुपयांचा मास्टर प्लॅन, फेरीवाल्यांसाठी क्यूआर कोड प्रणाली, सीॲंडडी कचऱ्यासाठी जीपीएस ट्रॅकिंग, एआय आणि रोबोटिक्स लॅब, एचपीव्ही लसीकरण यांसारख्या उपक्रमांची माहिती देण्यात आली आहे.

### राणीबागेसाठी ४९० कोटींची तरतूद

भायखळा प्राणीसंग्रहालय विस्तारासाठी प्रस्तावित ४९० कोटी रुपये, फूटपाथ रेलिंगसाठी ३८५ कोटी रुपये आणि रोड मार्किंगसाठी १५० कोटी रुपयांचे टेंडर रद्द करून सुमारे एक हजार कोटी रुपयांची बचत केल्याचा दावा भाजपने केला आहे. गारगाई-पिंजाळ जलप्रकल्पातही २७० कोटी रुपयांची बचत झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आरोपींना नोटीस

**मुंबई :** काँग्रेस नेते पवनराजे निंबाळकर व त्यांचे चालक समद काझी यांच्या दुहेरी हत्यांकांड प्रकरणी सर्व आरोपींना निर्दोष सोडण्याचा सीबीआयच्या निकाला विरोधात उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.

मूळ तक्रारदार आणि पवनराजे निंबाळकर यांच्या पत्नी आनंदीदेवी निंबाळकर यांनी दाखल केलेला याचिकेची न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने दखल घेत, माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व निर्दोष मुक्त झालेल्या आरोपींना नोटीस बजावत उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

उस्मानाबाद जिल्ह्यातील नेते पवनराजे निंबाळकर ३ जून २००६ रोजी नवी मुंबईच्या कळंबोली येथे पवनराजे निंबाळकर यांची गोळ्या झाडून निघृण हत्या करण्यात आली होती.

# कुकडी प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी रुपयांची तरतूद

### राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई :** पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या कामासाठी चौथी सुधारित प्रशासकीय मंजुरी देतानाच या प्रकल्पासाठी ५ हजार ७०४ कोटी ५० लाख रुपयांच्या तरतुदीस मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागातील सिंचन सुविधांना बळकटी मिळणार आहे.

कुकडी पाटबंधारे प्रकल्प येडगाव, माणिकडोह, वडज, डिंभे आणि पिंपळगाव जोगे या पाच धरणांचा संयुक्त प्रकल्प आहे. या पाच धरणांची एकूण उपयुक्त पाणीसाठा क्षमता ३०.५२ टीएमसी असून प्रकल्पाचा पाणीवापर ३९.३६ टीएमसी इतका आहे. प्रकल्पामुळे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर आणि शिरूर, अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा आणि कर्जत तसेच सोलापूर जिल्ह्यातील करमाळा या सात टंचाईग्रस्त तालुक्यांतील एकूण १ लाख ४४ हजार ९१२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

दरसूचीतील वाढ, जादा दराच्या निविदांची स्वीकृती, भूसंपादनाच्या खर्चातील वाढ, विशेषतः नवीन भूसंपादन कायद्यामुळे झालेली वाढ, संकल्पचित्रातील बदल, नवीन अथवा वगळलेल्या तरतुदी, अपुऱ्या तरतुदी तसेच अन्य अनुषंगिक खर्चामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. त्यानुसार राज्यस्तरीय तांत्रिक समितीने प्रस्तावाची छाननी केल्यानंतर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने हा चौथ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर केला होता.

# 'एबीसी-अपार' आयडी परीक्षांसाठी अनिवार्य

## ११ हजार विद्यार्थ्यांची लिंकिंग प्रक्रिया अद्याप अपूर्ण

**मुंबई :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्रेडिट्सचे डिजिटल स्वरूपात संकलन, संचयन, हस्तांतरण आणि पडताळणी करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने एबीसी आयडी/अपार आयडी अनिवार्य केले आहे.

मुंबई विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी परीक्षा अर्ज भरताना प्रत्येक विद्यार्थ्याने आपला वैध एबीसी आयडी/अपार आयडी नमूद करणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जात नमूद केलेला आयडी त्यांच्या परीक्षा प्रवेशपत्रावर दर्शविण्यात येणार आहे. असे असूनही अद्याप ११ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी अद्याप आपला एबीसी आयडी/अपार आयडी विद्यापीठाच्या पोर्टलशी जोडलेला नसल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आले आहे. या विद्यार्थ्यांची यादी संबंधित महाविद्यालये व संस्थांना देण्यात आली आहे.

ज्या विद्यार्थ्यांकडे वैध एबीसी आयडी/अपार आयडी उपलब्ध नाही किंवा ज्यांनी तो विद्यापीठाच्या पोर्टलशी जोडलेला नाही, अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेशपत्र विद्यापीठामार्फत निर्गमित केले जाणार नाही, असे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाने यापूर्वी विविध परिपत्रकांद्वारे विद्यार्थ्यांना एबीसी आयडी/अपार आयडी तयार करून विद्यापीठाच्या पोर्टलशी जोडण्याचे आवाहन केले आहे. तसेच या अनुषंगाने विशेष शिबिराचे आयोजनही विद्यापीठामार्फत करण्यात आले होते. मात्र, अद्याप ही प्रक्रिया पूर्ण न केलेल्या विद्यार्थ्यांनी तातडीने ही प्रक्रिया पूर्ण करावी.

### गुंतवणूक, आर्थिक विकासाला चालना मिळण्याचा मुख्यमंत्र्यांचा विश्वास

# जमिनीचा 'सर्च रिपोर्ट' एका क्लिकवर



**मुंबई :** महाभूमी स्टॅक प्रणालीमुळे राज्यातील सर्व जमिनीच्या मालकीहक्काबाबत एका क्लिकवर माहिती उपलब्ध होणार असल्याने राज्यातील गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी व्यक्त केला.

महसूल आणि वन विभागाकडून विकसित करण्यात आलेली भूमी प्रशासनासाठीची महाभूमी स्टॅक प्रणालीचा मंगळवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रारंभ करण्यात आला. महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांनी याविषयी सादरीकरण केले. त्यावेळी बोलताना फडणवीस यांनी राज्याच्या महसूल आणि जमीनविषयक सुधारणामधील हा अतिशय महत्वाचा टप्पा असल्याचे नमूद केले.

जमिनींचे खरेदी-विक्रीचे व्यवहारात आणि व्यवहारानंतर अनेक बाबतीत नागरिकांना महाभूलेख, महाभूनकाशा, आयडीआरएस यासारख्या विविध प्रणालींची मदत घ्यावी लागते. या सर्व विखुरलेल्या प्रणालीचे एकत्रीकरण करून दहा प्रमुख भूमी सेवा श्रेणींसाठी एकच एकात्मिक डिजिटल प्रवेशद्वार महाभूमी स्टॅकच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे, असे फडणवीस म्हणाले.

### महाभूमी स्टॅक प्रणाली अभिलेखांचे डिजिटल भांडार

- साडेतीन कोटींहून अधिक अधिकार अभिलेख (७/१२ आणि ८-अ)
- दीड कोटीहून अधिक भू-नकाशे आणि मिळकत पत्रिका
- ४० कोटींहून अधिक ऐतिहासिक स्कॅन केलेले फेरफार आणि जुने अभिलेख
- नोंदणी विभागाचे दस्त क्र.२ (इंडेक्स -२) च्या प्रती आणि महसूल न्यायालयीन प्रकरणांची अद्ययावत स्थिती

# 'विद्यार्थी-कुलगुरू संवाद' उपक्रम आज

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाने 'एनईपी कनेक्ट' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विद्यापीठ प्रशासनाशी थेट संवाद साधण्यासाठी 'विद्यार्थी-कुलगुरू संवाद' हा संवादात्मक उपक्रम सुरू केला आहे. या महिन्यातील पहिल्या विद्यार्थी संवाद उपक्रमाचे आयोजन बुधवार, २ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी संकुलातील छत्रपती शिवाजी महाराज भवन येथे करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि सर्व संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित राहणार आहेत.

vedanta iron & steel

# वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड

**सीआयएन:** एल२४१०९एमएच२०२३पीएलसी४११७७७
**नोंदणीकृत कार्यालय:** वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड, सी-१०३, अतुल प्रोजेक्ट्स, कॉर्पोरेट अव्हेन्यू न्यू लिंक, चकाला एमआयडीसी, मुंबई, महाराष्ट्र ४०० ०९३
दूरध्वनी क्र.: +९१ ८३२ ६७१३६०१ ई-मेल: visl.cs@vedanta.co.in संकेतस्थळ: www.vedantaironandsteel.com

## पोस्टल बॅलेट आणि दूरस्थ ई-मतदानाची सूचना

याद्वारे सूचना देण्यांत येते की, कंपनी अधिनियम, २०१३ (**''अधिनियम''**) च्या कलम १०८ आणि कलम ११० मधील तरतुदी, कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) रूल्स, २०१४ (**''नियम''**) मधील नियम २० आणि २२ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (**''एमसीए''**) जारी केलेल्या पूर्वीच्या परिपत्रकांसह वाचण्यात आलेले दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ चे सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ (**''एमसीए परिपत्रके''**), सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (**''सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स''**) चे नियम ४४ आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (**''आयसीएसआय''**) यांनी जारी केलेले जनरल मीटिंग्जवरील सेक्रेटेरियल स्टँडर्ड्स (**''एसएस-२''**) आणि इतर लागू कायदे, नियम व विनियम (त्यामधील कोणत्याही वैधानिक सुधारणा, बदल किंवा त्या वेळेस अंमलात असलेल्या पुनर्अधिनियमनासह) आणि वेळोवेळी सुधारित केल्याप्रमाणे, यांचे पालन करून, वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड (**''कंपनी''**) च्या समभागधारकांची (**''सदस्य''**) मंजुरी पोस्टल बॅलेटद्वारे दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून खाली नमूद केलेले कामकाज करण्यासाठी मागवत आहे.

| अनु. क्र. | ठरावाचे वर्णन | ठरावाचा प्रकार |
|---|---|---|
| १. | कंपनीचे वैधानिक लेखापरीक्षक म्हणून मेसर्स. एस. आर. बाटलीबॉय अँड कंपनी एलएलपी, चार्टर्ड अकाउंटंट्स यांची नियुक्ती | सामान्य |
| २. | 'वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड एम्प्लॉयी स्टॉक ऑप्शन प्लॅन २०२६' आणि त्याची अंमलबजावणी ट्रस्टमार्फत विचारात घेणे व मंजूर करणे | विशेष |
| ३. | कंपनी आणि कंपनीच्या धारक/सहायक कर्मचाऱ्यांसाठी 'वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड एम्प्लॉयी स्टॉक ऑप्शन प्लॅन २०२६' चा विस्तार विचारात घेणे व मंजूर करणे | विशेष |
| ४. | 'वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड एम्प्लॉयी स्टॉक ऑप्शन प्लॅन २०२६' च्या अंमलबजावणीसाठी ट्रस्टमार्फत समभागांचे दुय्यम अधिग्रहण विचारात घेणे व मंजूर करणे | विशेष |
| ५. | 'वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड एम्प्लॉयी स्टॉक ऑप्शन प्लॅन २०२६' अंतर्गत ट्रस्टमार्फत कंपनीचे स्वतःचे समभाग खरेदी करण्यासाठी कंपनीकडून निधीची तरतूद विचारात घेणे व मंजूर करणे | विशेष |
| ६. | 'वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड एम्प्लॉयी शेअर परचेस प्लॅन २०२६' आणि ट्रस्टमार्फत त्याची अंमलबजावणी विचारात घेणे व मंजूर करणे | विशेष |
| ७. | कंपनी आणि कंपनीच्या धारक/सहायक कर्मचाऱ्यांसाठी 'वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड एम्प्लॉयी शेअर परचेस प्लॅन २०२६' चा विस्तार विचारात घेणे व मंजूर करणे | विशेष |
| ८. | 'वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड एम्प्लॉयी शेअर परचेस प्लॅन २०२६' च्या अंमलबजावणीसाठी ट्रस्टमार्फत समभागांचे दुय्यम अधिग्रहण विचारात घेणे व मंजूर करणे | विशेष |
| ९. | 'वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड एम्प्लॉयी शेअर परचेस प्लॅन २०२६' अंतर्गत ट्रस्टमार्फत कंपनीचे स्वतःचे समभाग खरेदी करण्यासाठी कंपनीकडून निधीची तरतूद विचारात घेणे व मंजूर करणे | विशेष |
| १०. | कंपनी आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे | सामान्य |
| ११. | सेसा रिसोर्सेस लिमिटेड (''एसआरएल''), कंपनीची महत्त्वपूर्ण सहायक आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे | सामान्य |
| १२. | सेसा मायनिंग कॉर्पोरेशन लिमिटेड (''एसएमसीएल''), कंपनीची महत्त्वपूर्ण सहायक आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे | सामान्य |
| १३. | ब्लूम फाउंटन लिमिटेड (''बीएफएल''), कंपनीची महत्त्वपूर्ण सहायक आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे | सामान्य |
| १४. | ईएसएल स्टील लिमिटेड (''ईएसएल''), कंपनीची महत्त्वपूर्ण सहायक आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे | सामान्य |
| १५. | वेस्टर्न क्लस्टर लिमिटेड (''डब्ल्यूसीएल''), कंपनीची महत्त्वपूर्ण सहायक आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे | सामान्य |
| १६. | देसाई सिमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (''डीसीसीपीएल''), कंपनीची महत्त्वपूर्ण सहायक आणि कंपनीच्या काही निश्चित केलेल्या संबंधित पक्षांदरम्यान महत्त्वपूर्ण संबंधित पक्ष व्यवहार विचारात घेणे व मंजूर करणे | सामान्य |

वरील एमसीए परिपत्रकांनुसार, कंपनीने स्पष्टीकरणात्मक निवेदनासह पोस्टल बॅलेट सूचना (**''सूचना''**) केवळ इलेक्ट्रॉनिक स्वरूपात अशा सदस्यांना पाठविली आहे, ज्यांची नावे **शुक्रवार, २८ ऑगस्ट, २०२६ (''कट-ऑफ तारीख'')** रोजी डिपॉझिटरीजकडून प्राप्त सदस्य नोंदवही किंवा लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये दिसून येतात आणि ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड (**''केफिन''**)/डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टिसिपंट (**''डीपीज''**) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत आणि ती सोमवार, ३१ ऑगस्ट, २०२६ रोजी पूर्ण करण्यात आली आहे. त्यानुसार, सूचनेच्या प्रत्यक्ष प्रती, पोस्टल बॅलेट फॉर्म आणि पूर्व-शुल्क भरलेले बिझनेस रिप्लाय लिफाफे सदस्यांना पाठविण्यात येत नाहीत आणि संमती किंवा असहमतीची माहिती केवळ दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे दिली जाईल.

ई-मेल पत्त्यांची नोंदणी न केल्यामुळे सूचना प्राप्त न झालेल्या सदस्यांना त्यांच्या संबंधित डीपींकडे त्यांचे ई-मेल पत्ते नोंदविण्याची किंवा अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येते.

सदस्यांचे मतदानाचे अधिकार कट-ऑफ तारखेला कंपनीच्या भरलेल्या इक्विटी भागभांडवलातील त्यांच्या समभागांच्या प्रमाणात असतील. कट-ऑफ तारखेला कंपनीचा भागधारक नसलेली कोणतीही व्यक्ती या पोस्टल बॅलेट सूचनेकडे केवळ माहितीच्या उद्देशाने पाहील.

कंपनीने सदस्यांना ई-मतदान सेवा उपलब्ध करून देण्यासाठी केफिनची नियुक्ती केली आहे. ई-मतदानाची सुविधा खालील कालावधीत उपलब्ध असेल:

| | |
|---|---|
| ई-मतदानाचा प्रारंभ | मंगळवार, ०१ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ०९:०० वा. (भारतीय प्रमाणवेळ) |
| ई-मतदानाची समाप्ती | बुधवार, ३० सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वा. (भारतीय प्रमाणवेळ) |

बुधवार, ३० सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वा. (भारतीय प्रमाणवेळ) नंतर दूरस्थ ई-मतदान सुविधा तत्काळ निष्क्रिय केली जाईल आणि त्यानंतर सदस्यांना मतदान करता येणार नाही. सदस्यांचे मतदानाचे अधिकार कट-ऑफ तारखेला भरलेल्या इक्विटी भागभांडवलामध्ये त्यांच्याकडे असलेल्या इक्विटी समभागांच्या प्रमाणात असतील. एकदा ठरावावर मतदान केल्यानंतर, सदस्याला त्यात नंतर बदल करता येणार नाही. कृपया नोंद घ्यावी की सदस्यांची संमती किंवा असहमती केवळ दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे कळविली जाईल. कट-ऑफ तारखेला सदस्य नोंदवही/डिपॉझिटरीजकडून राखण्यात आलेल्या लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये ज्यांची नावे नोंदविलेली आहेत, केवळ अशा सदस्यांनाच दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान करण्याचा अधिकार असेल.

सदस्यांना ही सूचना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्राप्त होण्यास सुलभता व्हावी म्हणून, एमसीए परिपत्रकांच्या अनुषंगाने कंपनीने आपल्या आरटीएमार्फत ई-मेल पत्त्यांच्या नोंदणीची व्यवस्था केली आहे. ज्या सदस्यांनी अद्याप आपला ई-मेल आयडी नोंदविलेला नाही, त्यांनी त्यांचे समभाग इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असल्यास संबंधित डीपीकडे किंवा नोंदणीकृत ई-मेल आयडीवरून कंपनीला visl.cs@vedanta.co.in येथे किंवा कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट, केफिन यांना einward.ris@kfintech.com येथे ई-मेल करून किंवा समभाग प्रत्यक्ष स्वरूपात असल्यास केफिनच्या पत्त्यावर प्रत्यक्ष कागदपत्रे पाठवून नोंदणी करावी.

आरटीएकडे ई-मेल पत्ता नोंदविण्याची प्रक्रिया आणि दूरस्थ ई-मतदानाची प्रक्रिया सूचनेमध्ये दिलेली आहे.

कंपनीच्या संचालक मंडळाने सीएस शिवराम भट (सदस्यत्व क्र.: ए१०४५४, सीपी क्र.: ७८५३) यांची पोस्टल बॅलेट प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी आणि मतदानाची संपूर्णता सुनिश्चित करण्यासाठी परिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की सूचना कंपनीच्या www.vedantaironandsteel.com या संकेतस्थळावर, स्टॉक एक्स्चेंजेस म्हणजे बीएसई लिमिटेड (**''बीएसई''**) आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (**''एनएसई''**) यांच्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com या संकेतस्थळांवर तसेच केफिनच्या www.evoting.kfintech.com या ई-मतदान संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

परिक्षक आपला अहवाल कंपनीचे अध्यक्ष किंवा कंपनीच्या कोणत्याही प्राधिकृत व्यक्तीकडे सादर करतील आणि पोस्टल बॅलेटचे निकाल वैधानिक कालमर्यादेत घोषित केले जातील. सदर निकाल परिक्षकारांच्या अहवालासह कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात आणि कॉर्पोरेट कार्यालयात प्रदर्शित केले जातील व कंपनीचे समभाग ज्या एनएसई आणि बीएसईवर सूचीबद्ध आहेत त्यांना कळविले जातील. याव्यतिरिक्त, निकाल कंपनीच्या www.vedantaironandsteel.com या संकेतस्थळावर आणि केफिनच्या evoting.kfintech.com या संकेतस्थळावरही अपलोड केले जातील.

कोणत्याही शंका असल्यास, भागधारकांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (**''एफएक्यूज''**) आणि evoting.kfintech.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध भागधारकांसाठी ई-मतदान वापरकर्ता पुस्तिका पाहू शकता. कोणत्याही शंका/चिंता/तक्रारी असल्यास, श्री. गणेश चंद्र पात्रो, डेप्युटी व्हाइस प्रेसिडेंट, केफिन, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट ३१ व ३२, गाचीबोवली, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली मंडल, हैदराबाद ५०० ०३२, भारत यांच्याशी einward.ris@kfintech.com या ई-मेलवर किंवा १८००-३०९-४००१ (टोल फ्री) वर संपर्क साधू शकता.

**नोंदणीकृत कार्यालय:**
**सी-१०३ अतुल प्रोजेक्ट्स, कॉर्पोरेट अव्हेन्यू न्यू लिंक,**
**चकाला एमआयडीसी, मुंबई, महाराष्ट्र, ४०० ०९३**
**सीआयएन: एल२४१०९एमएच२०२३पीएलसी४११७७७**
**ई-मेल आयडी: visl.cs@vedanta.co.in**
**संकेतस्थळ: www.vedantaironandsteel.com**
**दूरध्वनी: +९१ ८३२६७१३६०१**
**ठिकाण: पणजी-गोवा**
**दिनांक: ०१/०९/२०२६**

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेडकरिता**

**टीना लखानी**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**
**एसीएस क्र.: ३४७२३**